**मुख्य कार्यालय, विरार**
**विरार (प),**
**ता. वसई, जि. पालघर, पिन 401 303.**

**दुरध्वनी : 0250-2525105/06/2529888/2529890**
**फॅक्स : 0250-2525107**
**ई-मेल : vasaivirarcorporation@yahoo.com**


**जावक क्र. : व.वि.श.म./ /**
दिनांक: ०५/०४/२०२६

**"डिजिटल जनगणनेकडे वाटचाल : वसई-विरारमध्ये क्षेत्रीय प्रशिक्षकांना विशेष प्रशिक्षण"**

वसई-विरार शहर महानगरपालिकेतर्फे जनगणना २०२७ च्या पार्श्वभूमीवर क्षेत्रीय प्रशिक्षक (Field Trainers) यांच्यासाठी विशेष प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. दिनांक ६ एप्रिल ते १६ एप्रिल २०२६ दरम्यान विरार (पश्चिम) येथील प्रभाग समिती 'ए' बोळींज नवीन कार्यालयात हा उपक्रम राबविण्यात येत आहे.

जनगणना प्रक्रियेतील पहिला टप्पा 'घरयादी व घरगणना' असून तो दि.१६ मे ते १४ जून २०२६ दरम्यान पार पडणार असून यासाठी प्रगणक आणि पर्यवेक्षकांची नियुक्ती करण्यात येणार आहे. त्यांचे प्रशिक्षण एप्रिलच्या शेवटच्या आठवड्यात होणार असून त्यांना प्रशिक्षण देण्यासाठी क्षेत्रीय प्रशिक्षक (फिल्ड ट्रेनर) यांना प्रशिक्षण देण्याच्या दृष्टीने विशेष प्रयत्न या प्रशिक्षणातून करण्यात येणार आहे. दुसरा टप्पा फेब्रुवारी २०२७ मधील मुख्य जनगणना आहे. देशाच्या नियोजन, विकास व धोरणनिर्मितीसाठी अचूक जनगणना अत्यंत महत्त्वाची मानली जाते. या पार्श्वभूमीवर क्षेत्रीय अधिकाऱ्यांना अद्ययावत डिजिटल साधनांचा वापर, अचूक माहिती संकलन आणि जनतेशी प्रभावी संवाद यांचे प्रशिक्षण दिले जाणार आहे.

या प्रशिक्षणासाठी मास्टर ट्रेनर म्हणून डॉ. महादेव इरकर व जनगणना निदेशालय, मुंबई येथील श्री संजय नाईक मार्गदर्शन करत आहेत. महानगरपालिकेचे आयुक्त तथा प्रधान जनगणना अधिकारी पृथ्वीराज बी.पी. यांच्या नेतृत्वाखाली, अतिरिक्त आयुक्त (जनगणना) श्री संजय हेरवाडे आणि उपायुक्त हर्षला राणे (शहर जनगणना अधिकारी)यांच्या समन्वयातून हा उपक्रम राबविण्यात येत आहे.

या प्रशिक्षणामुळे जनगणना प्रक्रिया अधिक पारदर्शक, कार्यक्षम व परिणामकारक होईल, असा विश्वास प्रधान जनगणना अधिकारी तथा आयुक्त वसई विरार शहर महानगरपालिका यांनी व्यक्त केला आहे